PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Ya Gol Gol Dabyatla
Year: 2012

Song: Navin Ha Kshan
Lyricist:

नवीन हा क्षण मोहविणारा
हो नवीन हा क्षण मोहविणारा
पानातूनी वारा बोलविणारा
क्षण असा मला सावरणारा
सुखावला क्षण चंचलणारा
लागेल खोल जाईल तोल
धावे कुठे आज मोकळा
मनात ओल कानात बोल
धरू कसा क्षण चांगला
क्षण खुळा हा क्षण खुळा
आणि मला ही वेडावून हरवला
क्षण खुळा हा क्षण खुळा
आणि मला ही वेडावून हरवला
क्षण खुळा हा क्षण खुळा
भुलवणारी वेळ आहे
भुलण्याचा बेत आहे
कोवळे हे प्रीत धागे
तुला मला ओढ लागे
मोहरेपण आत काही थांबवेना
आज काही मोकळेपण
तुझ्यासवे हे आठवेना
आज का हे
दुरावला भेटला कोणी हा प्राणातला
क्षण खुळा हा क्षण खुळा
आणि मला ही वेडावून हरवला
क्षण खुळा हा क्षण खुळा
आणि मला ही वेडावून हरवला

क्षण खुळा हा क्षण खुळा
हजार स्वप्ने दोन डोळे
कोरडे ते कधी ओले
मला हवेसे भेटलेले
धुके ते सारे लोपलेले
वळून मागे फिरू नको रे
थांब हृदयी हलू नको रे
असेच होते तसे ना होते
अरे मना तू छळू नको रे
शब्दातूनी अर्थ हा लागेना प्रेमातला
क्षण खुळा हा क्षण खुळा
आणि मला ही वेडावून हरवला
क्षण खुळा हा क्षण खुळा
आणि मला ही वेडावून हरवला
क्षण खुळा हा क्षण खुळा
नवीन हा क्षण मोहविणारा
पानातूनी वारा बोलविणारा
क्षण असा मला सावरणारा
सुखावला क्षण चंचलणारा
लागेल खोल जाईल तोल
धावे कुठे आज मोकळा
मनात ओल कानात बोल
धरू कसा क्षण चांगला
क्षण खुळा हा क्षण खुळा
आणि मला ही वेडावून हरवला
क्षण खुळा हा क्षण खुळा
आणि मला ही वेडावून हरवला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*